
# मॅजिक वर्ड - Inspiring thoughts

श्री. दत्तात्रय कृष्णा निकम




हे पुस्तक म्हणजे माझे अनुभव, विचार तसेच काही जेष्ठ प्रसिद्ध व्यक्तींचे विचार यांचा सारांश आहे. तुम्हाला हे पुस्तक वाचून एक प्रकारचा आत्मविश्वास आणि प्रेरणा मिळावी म्हणून प्रामाणिक प्रयत्न.

# मॅजिक वर्ड

श्री. दत्तात्रय कृष्णा निकम

ई साहित्य प्रतिष्ठान

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

हे वाचल्यावर **खर्च** करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.

## साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

# मॅजिक वर्ड

## लेखक : दत्तात्रय कृष्णा निकम

श्री. दत्तात्रय कृष्णा निकम
अ / ४०४, चंदन , मैत्री वाटिका ,
परसिकनगर,जुना मुंबई पुणे रोड,
कळवा, ठाणे-४००६०५
फोन नं. ९८१९१६६८१५

E-mail: dkn28379@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे . तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .

प्रकाशक--- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmaaail.com

©esahity Pratishthan®2018

प्रकाशन : ५ जून २०१८


विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध

- आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता
- हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.

# मनोगत

प्रिय वाचकहो,

नमस्कार ! आपणास माझे विचार माझ्या **समज-गैरसमज** या पुस्तकाद्वारे वाचनास उपलब्ध करून दिल्याबद्दल ई-साहित्य चे मनापासून आभार. अशा संधी प्रत्येकास देत आहात आणि देत रहा, कदाचित त्यामुळे मराठी साहित्यास नविन लेखक आणि नविन विषय मिळतील अशी आशा करतो.




तसेच ह्या पुस्तका व्यतिरिक्त मी माझ्या **प्रवास आणि परिचय - पासपोर्ट आठवणींचा** या पुस्तकाचे लिखाण करत आहे.

आज मी आपणासमोर माझे नवीन पुस्तक **मॅजिक वर्ड...Inspiring thoughts** घेवून येत आहे. तसा विषय तुमच्या ओळखीचा आहे, परंतु त्याची मांडणी थोड्या वेगळ्या प्रकारे करण्याचा मानस आहे. यात आम्हाला नक्कीच यश मिळले अशी आशा करतो.

आपल्या सर्वांचे जीवन कदाचित सुख-समृद्धीचे असेलही, त्यात कदाचित काहीजण दुःखी कष्टी असतीलही परंतु यातून बाहेर पडण्यासाठी अपार कष्ट, तुमच्या प्रवासाचा प्रवाह आणि चांगल्या विचारांचा उगम हा एक उत्तम पर्याय होऊ शकतात.

मानवी मनाला सुखाचे क्षण देणारे, दुःखातून जिद्दीने जीवन जगण्याची उमेद निर्माण करणारे, प्रेरणादायी ठरणारे काही चांगले विचार किंवा मग शब्द तुमचे जीवन बदलून टाकण्याची क्षमता ठेवून असतात. एक प्रयत्न म्हणून अशाच अमूल्य शब्दांचा, विचारांचा ठेवा संग्रही करून आपणासमोर सादर करत आहे. हा विषय हाताळताना आम्ही काही मराठी आणि इंग्रजी शब्दांचा संग्रह केला आहे. कदाचित त्यातून निघणारे अर्थ, निर्माण होणारी विचारांची प्रेरणा तुमच्या पर्यंत पोहचण्यासाठी आम्हाला मदत होईल. असे प्रेरणादायी विचार तुम्हाला सुद्धा येत असतील, परंतु त्याचे आकलन, परिस्थितीनुसार निर्णय घेण्याचे धाडस करू शकत नसाल. अशा सर्वांसाठी आमचा हा एक छोटासा प्रयत्न **मॅजिक वर्ड.. Inspiring thoughts** च्या माध्यमातून आपणासमोर सादर करत आहे.

धन्यवाद !


आपला



मी मराठी

श्री. दत्तात्रय कृष्णा निकम

# अर्पण पत्रिका




विचारांची शक्ती, कृती आणि आपल्या प्रयत्नावर विश्वास असणाऱ्या सर्वांसाठी,

वाचकांसाठी आणि हितचिंताकासाठी अर्पण !

# अनुक्रमणिका

१. विचार मंथन-१: बाळकडू...इच्छा शिकण्याची

२. विचार मंथन -२: कला आत्मसाताची...अनुभव घेणे

३. विचार मंथन ३ : अपेक्षा...एक रियालिटी

४. आभार तुमचे !

## विचार मंथन-१: बाळकडू...इच्छा शिकण्याची

मला माझ्या आयुष्यात उत्तमोत्तम संस्कार, ज्ञान, विचार व आचरण देणारे आई-बाबा, गुरुवर्य आणि जिवाभावाचे मित्र लाभले, हे मी माझे भाग्य समजतो. परिस्थितीच्या दरवाज्यावर वारंवार संघर्ष करून प्रगतीचा मार्ग अवलंबनासाठी मला ज्या **मॅजिक वर्ड** ने प्रेरणा दिल्या त्याचा सारांश फक्त तुमच्यासाठी सादर करीत आहे. सध्या सगळेच कसे सोयीस्करपणे उपलब्ध आहे. इंटरनेट प्रणालीमुळे सर्व जग कसे जवळ आले आहे, मग ई-मेल, व्हाट्स-अप, ईंटरनेट कॉल अशा विविध तंत्रज्ञानाने घेरलेले असताना विचारांची देवाण घेवाण कमी होत आहे. त्यामुळे कदाचित काही जणांचे विचार-विवेंचन, वाचन कमी झाले असावे, काही जण वाचतही असतील पण अर्थ लागत नसतील किंवा काही कारणास्तव वाचायला वेळ मिळत नसेल. औद्योगिक प्रगतीमुळे कामाच्या तऱ्हा बदललेल्या, काम करण्याच्या बदललेल्या काही नविन पद्धती किंवा मग त्यातून वाढलेल्या महत्वाकांक्षा पूर्ण करण्याचा तणाव आणि त्यातून मार्ग काढत चाललेलो **आपण**. अशा या **आपण** साठी विचार मंथन सादर करीत आहे, कारण वरील परिस्थितीतून मार्ग काढणे कदाचित थोडे सोपे जाईल. ह्या भागात सादर केलेले काही विचार मी स्वतः लिहिलेले आहेत, काही जेष्ठ व्यक्तीचे विचार अनुभवून पाहिले आहेत आणि त्याचा फायदा मला माझ्या जीवनात झाला तसा तो तुम्हाला सुद्धा होईल यात काही शंका वाटत नाही.

ज्यांचे कर्म चांगले असते ते कधीही संपत नाहीत, सत्कर्मी माणसाला जीवनात अडचणी खूप येतात, पण त्या सुटणाऱ्या असतात ही एक गोष्ट तुम्ही नेहमी लक्षात ठेवा. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीमध्ये सत्कार्य करणे सोडू नका, कारण त्याचे फळ नक्की मिळते. समस्यांना घाबरण्यापेक्षा त्यांचा सामना केला पाहिजे, आयुष्यात अनेक अडचणी येतात आणि त्याचा सामना करणे क्रमप्राप्त आहे. त्याचा सामना करताना मला सुचलेले आणि वेळो-वेळी माझ्या कामी आलेले दोन मंत्र तुमच्यासाठी - **प्रॉब्लेम आणि पॉवर ऑफ ई.** मी स्वतः भाग्यवंत समजतो कारण मला माझ हे मंत्र शालेय विद्यार्थांना देण्याची संधी **प्रियदर्शन शैक्षणिक** शिबिरात सादर करण्याच्या संधी मिळाल्या.

- **प्रोब्लेम (What is Problems ?):** प्रोब्लेम म्हंटले की नुसते आठवतात ते अवघड प्रसंग, त्यातून जाणवणारा तणाव हा प्रत्येकाला नकोसा वाटतो आणि ते सुद्धा खरे आहे. एक विचार मनात येवून जातो ह्या अडचणी सोडवायच्या की आपली प्रगती साधायची. पण आपण तणावात असताना एक गोष्ट विसरून जातो अडचणीशिवाय यशापर्यंत पोहचता येत नाही. अडचणी येण्याचे मुख्य कारण आपले ध्येय गाठण्यासाठी आपण पूर्णपणे तयार नाही. अशी मनाची तयारी करण्यासाठी आपण अडचणींचा (प्रॉब्लेम) सामना करायला शिकले पाहिजे.

  त्यासाठी पहिल्यांदा आपण समजून घेतले पाहिजे ह्या अडचणी किंवा मग समोर येणारे प्रॉब्लेम नक्की असतात तरी काय ? परंतु जर आपण प्रोब्लेम माझ्या नजरेतून पाहिलात तर कदाचित तुम्हाला वेगळा अर्थ लागू शकतो ...प्रोब्लेमचा आणि थोडाफार आधार सुद्धा मिळेल स्वतः सावरण्याचा.

- **P : Preparation for** ***(तयारीसाठी)***
- **R : Reminder of** ***(आठवणीसाठी)***
- **O : Opportunity** ***(संधीसाठी)***
- **B : Blessing** ***(आशीर्वादासाठी)***
- **L : For Learning** ***(शिकण्यासाठी)***
- **E : Educate Us** ***(अनुभवासाठी)***
- **M : Meaningful or message** ***(संदेशसाठी)***
- **S : Always have solution** ***(नेहमी उत्तरासाठी)***

❖ **पॉवर ऑफ ई (Power of E):** ही एक साधी, सरळ आणि सोपी पद्धत आहे. येथे ई चे तीन विचार - **१. शिकण्याची ईच्छा, २. अनुभव घेणे ३. अपेक्षा करणे,** असे हे **१-२-३** साधे सरळ समीकरण आहे. यातील एखादे तरी समीकरण जर चुकले तर तुमचे ध्येय साध्य होणार नाही.

**E**

**Eager to learn something (शिकण्याची ईच्छा)**

**Experience something useful (अनुभव घेणे)**

**Expect something (अपेक्षा करणे)**

**उदा. पहिले: १. शिकण्याची ईच्छा, ३. अपेक्षा करणे,** विचार करा जर तुमच्याकडे शिकण्याची ईच्छा पण तुम्हाला योग्य **अनुभव घेता आला नाही** मग अपेक्षा ठेवणे व्यर्थ आहे.

**उदा. दुसरे: २. अनुभव घेणे ३. अपेक्षा करणे,** विचार करा तुमच्याकडे अनुभव आहे आणि अपेक्षेप्रमाणे तुम्हाला मोबदला मिळेल परंतु तुम्ही जर नविन काही **शिकण्याची जर ईच्छा नसेल** तर तुमची प्रगती होण्यासाठी लागणारा अनुभव नसेल मग अपेक्षेप्रमाणे काही गोष्टी कदाचित तुमच्या मनासारख्या मिळणार नाहीत.

आयुष्यात प्रत्येक गोष्टीचे एक विशेष महत्व आहे. मग त्याचा तुम्ही विचार करा आणि आपल्या आयुष्यात यशस्वी होण्यासाठी मार्गस्थ व्हा.

अनुभव घ्यायला लाखो पुस्तके लागत नाही, पण लाखो पुस्तके लिहिण्यासाठी मात्र **विचार करावाच** लागतो. आपल्याला पंखासाठी म्हणून कधीच उडावे लागत नाही, पण उडण्यासाठी मात्र **पंखच लागतात**. काम करण्यासाठी चांगले नाव लागतेच असे नाही, पण चांगले नाव करण्यासाठी मात्र चांगले कामच करावे लागते. काही तरी मिळविण्यासाठी स्वतःवर थोडी फार बंधणे घालणे आवश्यक असते. अशा परिस्थितीत माझ्या समोर माझ्या अनुभवातून समोर आलेल्या इंदिरा गांधींच्या चार ओळी....फक्त आपल्यासाठी !

There are **two kinds of people**;

those who **do the work** and

those who **take the credit.**

try to be **in the first group**;

there is **less competition** there.

आजच्या काळात स्पर्धा खूप वाढली आहे किंवा मग कदाचित ती आपणचं वाढवली आहे. स्पर्धा असावी पण ती स्वतः ला पुढे घेऊन जाण्यासाठी, परंतु दुसऱ्याला मागे टाकण्यात नसावी. ह्या स्पर्धेच्या युगात प्रत्येक जण निव्वळ मान-सन्मान / यशाच्या मागे धावत आहोत आणि त्यासाठी लागणाऱ्या तडजोडी करण्यात तणावात जगत असेल. अशा परिस्थितीत डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा एक विचार आठवतो.

**Success** is when you're **Signature** changes to **Autograph**.

यशाची व्याख्या समजून घ्या, तुमचे ध्येय ठरवा आणि मग त्यानुसार योग्य प्रयत्न करा...मग बघा काय होते ते, बदल तुम्हाला स्वतः जाणवेल.

जर आपणसुद्धा काय करावे, काय करू नये, या द्विधा मनस्थितीतुन जात असाल, तर ह्या परिस्थितीला अनुसरून माझ्या वाचनात आलेला एक सत्यार्थी विचार - **Ways of Life** .

**Ways of Life**

- ✓ **Before You PRAY (प्रार्थना) - BELIEVE (विश्वास ठेवा)**
- ✓ **Before You SPEAK (बोलणे) - LISTEN (ऐका)**
- ✓ **Before You SPEND (खर्च) - EARN (कमावा)**
- ✓ **Before You WRITE (लिहिणे) - THINK (विचार करा)**
- ✓ **Before You QUIT (सोडणे) - TRY (प्रयत्न करा)**
- ✓ **Before You DIE (मृत्यूपूर्वी) - LIVE (आयुष्य जगा)**

असे अनेक विचार व विचारांचे बाळकडू आपणास मिळाले असतील, परंतु त्याची खरी गरज कधी आहे. ते योग्य बदल कदाचित या लेखातुन समजावून घेऊन आपण आवश्यक बदल नक्कीच घडवू शकता.

**ता.क.** : जीवनातील **सगळ्याच समस्या देवाच्या भरवशावर** सोडून चालत नाही, कुणास ठाऊक त्या **समस्या सोडवण्याकरिता देव तुमच्या भरवशावर** बसला असेल..

**विचार मंथन -२: कला आत्मसाताची...अनुभव घेणे**

आयुष्यात परिश्रमाचे चीज व्हावे ही प्रत्येकाची इच्छा असते परंतु काही गोष्टी आत्मसात केल्याशिवाय यशाला पर्याय नसतात. तुम्हाला असे अनुभव वारंवार येत असतील आणि त्यातून आपला गोंधळही होत असेल. प्रत्येक गोष्टीला एक ठराविक वेळ काळ यावा लागतो आणि ती कोणालाही चुकत नाही. अशा वेळी तुम्ही आतापर्यंत जे साध्य केले त्याची कसरत लागते. ह्या परिस्थितीला साजेसा विचार मला माझ्या एका मित्राने सांगितलेला.

- **जीवनाच्या या रंगमंचावर**

  **कोणी + करतो !**

  **कोणी - करतो !**

  **कोणी × करतो !**

  **कोणी ÷ करतो !**

  **फक्त परमेश्वरच सगळ्यांना योग्य वेळेवर = करतो !**

संधी प्रत्येकास मिळते परंतु आपली वेळ येईपर्यंत वाट पाहणारे बहुतेक वेळा यशस्वी होतात. तरीही एक मंत्र यशासाठी खूप महत्त्वाचा आहे.

**कारणे** सांगणारे लोक कधीही **यशस्वी** होत नाही...

आणि **यशस्वी** होणारे लोक **कारणे** सांगत नाही..

**सारांश: अयशस्वी लोक मंत्र देतात परंतु यशस्वी लोक त्याचे तंत्र देतात.**

मंत्र मिळतात, तंत्र उपलब्ध असतात परंतु तरीही काही गोष्टी चुकतात, त्या म्हणजे चुकीच्या समजामुळे. आयुष्यात अडथळे खूप असतात, नेहमी उच्च-मानांकित (ब्रॅण्डेड) वस्तूंचा वापर करा. मग पहा तुमच्या मार्गातील अर्ध-अधिक अडथळे कमी होण्यास मदत होईल.

१. **ओठ**....**सत्यासाठी**

२. **आवाज**....**प्रार्थनेसाठी**

३. **डोळे**.... **दयेसाठी**

४. **हात**.... **दानासाठी**

५. **हृदय**.... **प्रेमासाठी**

६. **चेहरा**.... **हास्यासाठी**

७. **मोठे बनण्यासाठी**....**माफी**

शेवटी तुमचे प्रयत्न आणि तुमच्या प्रवासाला मिळणारी दिशा खूप महत्त्वाची असते, अशा प्रसंगी बिल गेट्स यांच्या अति महत्वाच्या चार ओळी आठवतात.

**तुम्ही गरीब म्हणून जन्माला आला**

**यात तुमचा काहीच दोष नाही**

**पण जर तुम्ही गरीब म्हणून मेलात**

**तर हा नक्कीच तुमचा दोष असेल !**

**- बिल गेट्स**

तुमची प्रगती तुम्हाला साधायची असते त्यात तुमचे विचारच तुम्हाला पुढे घेऊन जातात. झोपेत स्वप्न पाहून स्वप्न पूर्ण होत नाहीत, स्वप्ने त्यांचीच पूर्ण होतात ज्यांची स्वप्ने त्यांना झोपू देत नाहीत.

खूप स्वप्न योग्य प्रकारे विचार नसल्याने कदाचित अपूर्ण रहात असतील..नेहमी आपल्यासाठी प्रयत्न करा दुसरे काय म्हणतात, काय करतात, याचा विचार करू नका.

**खूप माणसांची स्वप्ने या एका विचारांमुळे अपूर्ण राहतात तो म्हणजे लोक काय म्हणतील ?**

असे अनेक प्रसंग आहेत ज्यामुळे **विचार व ध्येय** या मध्ये दरी निर्माण होते.ती म्हणजे प्रामुख्याने मनाचा आणि विचारांचा ताळमेळ न झाल्याने. आपल्या **मनातील विचार आणि मनाचा दृढनिश्चय** आपणांस नाविन्यपूर्ण दिशेने जाण्याच्या प्रेरणा देतात. जर तुम्हाला तुमचे ध्येय साध्य करायचे असेल तर काही गोष्टी ह्या तुम्हाला आत्मसात कराव्याच लागतात आणि परिस्थितीनुसार स्वतःला बदलायला शिकायला हवे. वरील विचार तुम्हाला काही कला आत्मसात करायला मदत करतील अशी आशा आहे.

ता.क. : **आयुष्याचा पट हा बुद्धिबळासारखा असतो..**

**इथे प्रत्येक जण अगोदर तुम्हाला खेळ शिकवतो !**

**आणि एकदा तुम्ही या खेळात पारंगत झाला की,**

**प्रत्येकजण तुम्हाला हरवण्यासाठी खेळतो !**

**विचार मंथन ३ : अपेक्षा..एक रियालिटी**

आतापर्यंत तुम्ही **बाळकडू...इच्छा शिकण्याची आणि कला आत्मसाताची...अनुभव घेणे** आतापर्यंतच्या सदरात वाचले. आता आपण एक अत्यंत महत्वाची गोष्ट पाहणार आहोत आणि ती म्हणजे अपेक्षा एक रियालिटी.

काही गोष्टी वेळीच समजल्या तर बरे असे वाटते, कारण त्यातून आपणास कळते की कोण आपले आहे. यश आणि अपेक्षा माणसाला लाचार बनवतात म्हणून वेळीच स्वतःला सावरा आणि मग पुढे येणाऱ्या अडचणी तुम्ही टाळू शकता. ह्या परिस्थितीवर आधारित मी वाचलेला एक सुंदर विचार.

**आयुष्यात यश मिळवतो तेव्हा कळते**

**की आपण कोण आहोत,**

**पण अपयशी होतो तेव्हा कळते**

**की आपले कोण आहेत.**

बऱ्याचदा यशाचे नातेवाईक फार असतात परंतु अपयशाला खूप कमी नातेवाईक असतात. कदाचित अशा अनेक कारणामुळे नात्यामध्ये दुरावे निर्माण होतात, हुशारीने वागा आणि प्रत्येक गोष्टीचे चांगले-वाईट अनुभव पचवण्याची हिम्मत ठेवा.

**आवडीचे लोक**, **सवडीने वागायला** लागले

की नात्यांना **कवडीची किंमत** रहात नाही !

काही वेळा नविन आणि चांगले विचार तुम्हाला मार्ग दाखवून, प्रयत्न करण्याची हिम्मत देतात.

**तुमचे ध्येय कितीही उंच असो**

**त्याचा मार्ग नेहमी**

**तुमच्या पायाखालीच असतो**

**फक्त आपण नीट चालत नसतो !**

आयुष्यात तुमच्या स्वतःच्या अपेक्षा असणे सार्थ आहे व त्यासाठी योग्य प्रयत्न करणे सुद्धा गरजेचे आहे. त्या अपेक्षा, दुसऱ्याकडे आहे म्हणून माझ्याकडे असावे किंवा मग त्याला मिळाले म्हणून मला मिळाले पाहिजे तर ते योग्य नाही. तुमची ध्येय, तुमचे विचार हेच तुम्हाला तुमचे ध्येय साध्य करण्यासाठी योग्य मार्ग दाखवू शकतात. तर चांगला विचार करा चांगल्या संधी निर्माण होतील. आयुष्य कर्म करत रहा, याची प्रचीती तुम्हाला खालील विचार वाचून लक्षात येईल.

**अतिशय सुंदर**

**पाण्याने भरलेल्या तलावात**

**मासे किड्यांना खातात,**

**तोच तलाव कोरडा झाल्यास**

**किडे माश्यांना खातात,**

**संधी सगळ्यांना मिळते फक्त**

**आपली वेळ येण्याची वाट पहा.**

**सारांश:** आयुष्यात आपले कर्म करत रहा, अडचणी येत राहतील परंतु तुमचे प्रयत्न त्यातून नक्की मार्ग दाखवतील...प्रयत्न करत रहा !

असेच एकदा मी एका क्रीडा लेखात वाचलेले वाक्य कदाचित ह्याचा अर्थ तुम्हाला समजून घेण्यास मदत करेल.

**लहानपणी मी रडत होतो कारण माझ्याकडे मित्रांबरोबर**

**फुटबाल खेळण्यासाठी शूज नव्हते, पण एके दिवशी मी**

**अशा एका माणसाला पाहिले ज्याला पाय नव्हते,**

**तेव्हा जाणवले मी किती श्रीमंत आहे ते !**

**- झेनेदिन झिदान**

**सारांश:** आपण नेहमीच आपल्याकडे नसलेल्या गोष्टीचा विचार करतो आणि दु:खी होतो. आपल्या जवळ असणाऱ्या गोष्टीचा आनंद घ्या. प्रयत्न करा दुसऱ्या गोष्टी तुम्हाला आपोआपच मिळतील.

**लाखात एक वाक्य**

माणूस **स्वतःच्या चुकांसाठी** उत्तम **वकील** असतो,

परंतु **दुसऱ्याच्या चुकांसाठी** सरळ **न्यायाधीशच** बनतो

# आभार तुमचे !

आयुष्य फार सुंदर आहे आणि त्यातील तुमची असणारी ध्येय तुम्हाला गाठायची आहेत. त्यात प्रत्येकवेळी तुम्हाला संधी मिळतील, प्रत्येक संधी ओळखायला शिका, तुमच्या प्रवासाची दिशा ठरवा आणि तुमची ध्येय साध्य करण्यासाठी मार्गस्थ व्हा.

आमच्या या पुस्तकातील विचार जर तुम्हाला पटले असतील किंवा तुम्हाला प्रेरणा देत असतील तर हे पुस्तक वाचून झाल्यावर एखाद्या विद्यार्थ्याला वाचायला पुढे पाठवा किंवा मग तुमच्या मुलांबरोबर वाचा, त्याचे अर्थ समजावून सांगा.

जर आमच्या विचारांचा तुम्हाला तुमची ध्येय साधण्यासाठी प्रेरणा मिळाली असेल तर आम्हाला तुमचा अभिप्राय जरूर कळवा.

तुम्हा वाचकांचे शतशः आभार तुमचा मिळणारा प्रचंड प्रतिसाद आम्हाला नविन-नविन विषय हाताळण्यासाठी योग्य प्रेरणा देतात.

धन्यवाद !

मी मराठी


दत्तात्रय कृष्णा निकम

## Something to think ! Something you can do !









## थोडक्यात......

मी, दत्तात्रय कृष्णा निकम, मूळचा सातारा जिल्ह्यातील तालुका खटाव रहाटणी गावाचा, कामानिमित्त मी मुंबईत माझ्या कुटुंबासोबत पारसिकनगर कळवा (ठाणे) येथे वास्तवास आहे. मी स्वतः इंस्ट्रुमेंटेशन इंजिनिअर असून एका प्रायव्हेट कंपनीत **ऑईल अँड गॅस** डिजाईन सेंटर मध्ये सिनियर प्रिंसिपल इंजिनीअर म्हणून कार्यरत आहे.



मला स्वतःला वाचन , लेखन , क्रिकेट खेळणे, समाजसेवा यात प्रामुख्याने रस आहे. मला वाचनाची आवड आहे व मी माझ्या आयुष्यात लेखनाचे काम सुद्धा केले आहे, त्यात प्रामुख्याने मराठी लिखाण / साहित्याचा केले आहे.

मला माझ्या वाचनाच्या आवडीने मराठी, हिंदी व इग्रंजी साहित्य, वेग-वेगळ्या प्रकारचे लेख, कथा, आत्मचरित्र वाचण्याच्या संधी मिळाल्या. त्यात माझी आवड प्रामुख्याने मराठी साहित्य, विविध मराठी साहित्यिक वाचायला मिळाले. माझ्या वाचनाची सुरुवात श्री. पु. ल. देशपांडे, श्री.मंगेश पाडगांवकर, श्री. प्र. के. अत्रे आणि अश्या बऱ्याच मान्यवरांच्या लेखनाने झाली. मी आतापर्यंत वाचलेल्या पैकी बटाट्याची चाळ, तो मी नव्हेच असो किंवा मग सांगा आता कसे जगायचे खुपच प्रभावित करून गेले.

मी लिहिलेल्या माझ्या कविता - मन, नाद-खोडकर बंड्या, सांगा आता कसे जगायचे आधारित संकल्पना, चारोळ्या, लेख - भारत एक्सप्रेस, विचार, प्रवास वर्णन असे साहित्य मी सिंगापुर ला असताना महाराष्ट्र मंडळ, सिंगापूरच्या विविध मराठी कार्यक्रमात - **शब्दगंधा** असो किंवा मग **ऋतुगंध त्रैमासिक** किंवा मग **गणेशोस्तव स्मरणिका** मध्ये प्रसिद्ध झालेल्या आहेत मी मराठी ...दत्तात्रय कृष्णा निकम या नावाने. तसेच माझे स्वतःचे विचार मांडण्यासाठी मी सुरु केलेला माझा मराठी ब्लॉग **इंडिअन प्राऊड.....भारतीयांचा अभिमान** (**https://indianproud.blogspot.in**). हो थोडे वर्ष हा ब्लॉग बंद होता कारण तेव्हा मी माझ्या एका अभियांत्रिकी विषयाच्या पुस्तकावर काम करीत होतो. "**Fundamentals of Project planning and Engineering**" *for final year Instrumentation Engineering* च्या विद्यार्थ्यांसाठी ह्या जून -२०१७ महिन्यात प्रकाशित झाले. हे पुस्तक मुंबई विद्यापीठाच्या इंस्ट्रुमेंटेशन इंजिनीरिंग च्या आठव्या सेमिस्टर मध्ये वापरले जाणार आहे.

पण म्हणतात ना मराठी प्रेम तुम्हाला नेहमीच काहीना काही नवीन करण्याची प्रेरणा देतात माझे ही तसेच झाले असेल कदाचित कारण आजकालची सामाजिक परिस्थिती पाहून मी स्वतः खालील विषयावर काही शॉर्ट फिल्म्स सुद्धा बनविल्या आहेत. तसेच माझ्या मित्रांसाठी काही सामाजिक जागरुक्ता विषयावर “स्क्रीप्ट-नेरेशन” चे काम सुद्धा करीत आहे.

- प्रवास आयुष्याचा - (**https://youtu.be/oM3HZD6oGfQ**)
- माझ्या राजा रे..छत्रपती - (**https://youtu.be/ISlir3VQ47Q**)
- इन्शुरन्स विश्वासाचा - (**https://youtu.be/c8eWyfm4cek?list=PLgjnwVL7iXjp8eDCxgoZbsosSRkucjLV**)

तसेच माझे दुसरे पुस्तक **समज-गैरसमज** तुम्ही खालील लिंकवर वाचू शकता.

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/samaj_gairsamaj_dknikam.pdf

मी स्वतःला खूप भाग्यवंत समजतो कारण मला माझे करियर (प्रोफेशन) सांभाळून मराठी साहित्य किंवा मग सामाजिकतेसाठी काम करण्याची संधी मिळाली. मला वाटते प्रत्येकात एक कलाकार लपलेला असतो काही लोकांना तो कळतो काही लोक कळून न कळल्यासारखे वागतात तर काही जणांना मग कदाचित कळतही नसेल. परंतु मी सर्वांना एक सांगेन प्रत्येकाने आपल्यातील कलाकार ओळख आणि मग पहा आयुष्य किती मजेदार होते ते.....

धन्यवाद् !

मी मराठी

दत्तात्रय निकम

लेखकाचा पत्ता:

श्री. दत्तात्रय कृष्णा निकम
अ / ४०४, चंदन , मैत्री वाटिका ,
पारसिकनगर,जुना मुंबई पुणे रोड,
कळवा, ठाणे-४००६०५
मोबाईल / व्हाट्सअँप: ९८१९१६६८१५
ई-मेल : dkn28379@gmail.com